Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

November -2020


SPECIAL ISSUE-CCLXIII (263)

## INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE









Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor
Dr.S.N.Jadhavar
Head, Deptt. of History,
Sham Gadale Art's College,
Dahiphal (Wadmauli)
Tq.KAJJ,.Dist. BEED.

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Parbhani

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed
Multidisciplinary International Research Journal
November -2020

SPECIAL ISSUE

## INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
**Dr.S.N.Jadhavar**
Head, Deptt. of History,
Sham Gadale Art's College,
Dahiphal (Wadmauli)
Tq.KAJJ,.Dist. BEED.

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com* Aadhar Publications

 ISSN : 2278-9308
November 2020

Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



| | | |
|---|---|---|
| 20 | एच.आय.व्ही सह जीवन जगणाऱ्या विधवांच्या समस्या –एक अन्वेषणात्मक अभ्यास. **सुषमा शंकर तिनगोटे** | 79 |
| 21 | शोध – शीतला देवीचा प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के | 83 |
| 22 | धर्माधिष्ठित तत्वज्ञानाचा महिलांवरील अत्याचार : एक चिकित्सा (विशेष संदर्भ मूरळी देवदासी जोगतीण) डॉ. अनिता व्यंकटराव शिंदे | 87 |
| 23 | प्राचीन भारतातील कर्तबगार स्त्रिया आणि स्त्रियांचा दर्जा- एक दृष्टिक्षेप **प्रा.डॉ.संतोष रोहिदास पहारे** | 90 |
| 24 | 'हैदराबाद मुक्ती संग्रामात स्त्रियांचे योगदान डॉ.राजाराम रा पिपळपल्ले | 93 |
| 25 | भारताच्या अज्ञात इतिहासातील कर्तबगार राणी दुर्गावतीचा इतिहास प्रा.डॉ राजविरेंद्रसिंग रुबजी गावित | 98 |
| 26 | महिला सक्षमीकरणाची संकल्पना आणि सामाजिक-सांस्कृतिक व आर्थिक आशय **प्रा. शरद बाबुराव सोनवणे** | 102 |
| 27 | भारतवर्ष की ऐतिहासिक महिलाओं का देश के प्रति योगदान : स्त्री विमर्श **डॉ. रज़िया शहेनाज़ शेख अब्दुल्ला** | 105 |
| 28 | पंचायती—राज में महिला नेतृत्त्व और अशिक्षा सद्दाम हुसैन | 108 |
| 29 | औरंगाबाद शहरातील एच.आय.व्हि सह जीवन जगणाऱ्या रूग्णांना सेवा पुरविणाऱ्या व्यावसायिकांचे एच.आय.व्हि चे प्रमाण व परिणामाबाबत मत. **सुषमा शंकर तिनगोटे** | 112 |
| 30 | पंचायत राज व्यवस्थेतील विमुक्त जाती आणि भटक्या जमातींच्या महिलांचा राजकीय सहभाग विशेष संदर्भ कळंब तालुका **डॉ. नामानंद गौतम साठे** | 117 |
| 31 | प्रमुख १४ बँकांचे राष्ट्रीयकरण: श्रीमंती इंदीरा गांधी यांची भुमिका एक चिकित्सक अभ्यास. प्रा. डॉ. एस एल मेढे | 119 |
| 32 | मराठवाड्यातील स्त्री चळवळीचा चिकित्सक अभ्यास डॉ. मुळे पी.एम. | 123 |
| 33 | कौटुंबिक हिंसाचार : भारतीय महिला **प्रा.डॉ.तोटे दादासाहेब सर्जेराव** | 126 |
| 34 | **बौध्द धर्मातील स्त्रीयांचे स्थान व भूमिका प्रा.डॉ.सुवर्णा उमाकांत टेंकाळे (वाले)** | 128 |
| 35 | सावित्रीबाई फुलेंची कामगिरी **प्रा.कांबळे शिवाजी ईरबा** | 132 |
| 36 | भारतीय शेती व शेती व्यवसायात काम करणाऱ्या महिला डॉ.एम.डी.कच्छवे. | 135 |
| 37 | मराठी साहित्यातील स्त्रीचित्रण - एक अभ्यास **प्रा. डॉ. रामहारी मायकर** | 140 |
| 38 | स्त्रीवादी साहित्य मुळाटे **श्रीधर सुधाकर** | 144 |
| 39 | मराठी स्त्रीवादी साहित्य **प्रा.डॉ. हरिचंद नांगसू नरेटी** | 147 |

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

# भारतीय शेती व शेती व्यवसायात काम करणाऱ्या महिला

प्रा.डॉ.एम.डी.कच्छवे.
वाणिज्य विभाग प्रमुख सहयोगी प्राध्यापक व
संशोधन मार्गदर्शक कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय सोनपेठ जि.परभणी.
Email Id : mkachave@gmail.com

**प्रस्तावना: (Introduction)**

मानवी संस्कृतीत शेतीची सुरूवात महिलांनी केली. पुरूष शिकारीसाठी बाहेर जात असत. महिलांनी बिया गोळा करून त्या लावल्या आणि त्या बीयांची वाढ झाली. जगात शेतीत करून करणाऱ्यात महिलांचा समावेश आहे. असे ठामपणे प्रसिध्द कृषीतज्ञ स्वामीनथन यांनी मांडली. ‘शेतीचा विकास’ हा फार जूना आहे. यामध्ये दिवसेंदिवस अन्न धान्याची भर पडत गेली. शेती क्षेत्र हे ग्रामीण भागाच्या आणि देशाच्या आर्थिक विकासाचे मुख्य सूत्रधार आहे. ती किल्ली महिलांच्या हाती आहे. शेतीची आणि शेती पुरक व्यवसायाची मालकी महिलांकडे नाही. या संदर्भात जगातील कांही देशानी मालकी महिलांकडे राहावी यासाठी कांही देशांनी त्यांच्या कायद्यात बदल केले आहेत. शेती व्यवसायात काम करणाऱ्या महिला ७०टक्के अशिक्षीत आहेत. लग्नानंतर महिलांना पुरूषांची जी आर्थिक परिस्थिती आहे तिच्याशी जुळवून घ्यावे लागते. शेती आणि घरे पुरूषाच्या नावावर आहेत. अनेक खेडयात बहुतांश घरात कोंबडया पाळल्या जातात. त्या कोंबडयाचे पालन पोषन अंडी गोळा करणे, विक्री करणे ही सर्व कामे महिला करतात. मासेमारी, रेशीम व शेती व्यवसायात महिला मोठया प्रमाणात काम करत आहेत. पशुपालन व्यवसायात जनावरांना खुराक देणे, त्यांना पाणी पाजणे, त्यांची स्वच्छता करणे, दुध काढणे ही कामे महिलांकडून केली जातात.

भारतातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. उत्पादन पूर्व, प्रत्यक्ष उत्पादन आणि उत्पादनानंतरचा काळ या सर्वच काळात शेतीत महिलांचे योगदान मोठे असते. शेतीत राबणाऱ्या महिलांची संख्या मोठी असून महिलांचे कष्ट आणि योगदान दूर्लक्षीत असल्यामुळे शेतीसंबंधी कामे करणाऱ्या महिलांच्या अनेक समस्या जैसे थे अवस्थेत आहेत. शेती व्यवसायात फक्त पुरूष शेतकरी व पुरूष शेतमजूरांचा विचार केला जातो. खुरपणी, रोपे लागवड, भाजीपाला लागवड, फुले, फळे तोडणी पिकांची कापणी इत्यादी शेतीतील कामे वर्षभर करतात. शेतीत महिलांचे योगदान प्रभावी आहे. स्वत:च्या शेतात आणि इतरांच्या शेतात काम करणाऱ्या महिलां असे शेतात काम करणाऱ्या महिलांचे दोन गट असतात. या दोन्ही गटातील महिलांना घरातील दैनंदिन सर्व कामांची जबाबदारी पार पाडून शेतीतील कामात झोकून घावे लागते. शेतातील विविध कामाबरोबरच शेतीपूरक व्यवसाय असणाऱ्या पशुपालन, कुकूटपालन या व्यवसायातही भरपूर वेळ द्यावा लागतो. जनावरांचे गोठे साफ करणे, चारा–पाण्याची सोय करणे, धारा काढणे इ. मध्ये महिलांचा फार मोठा लागतात. वर्षभराचे धान्य गोळा करण्याचे आव्हान या महिलांसमोर असते. घरातील कामे आटोपून या महिला शेतशिवारात दाखल होवून ऊनवाऱ्यात काम करतात. ऊसतोड मजूर महिलां पोटाची खळगी भरण्यासाठी ऊन, वारा, पाऊस याची पर्वा न करता कष्ट करतात. एका शेतातील कामे संपल्यावर दुसऱ्या शेतात जाऊन मिळेल ते काम करावे लागते. तुटपुंज्या मजुरीवर संसाराचा गाडा महिला हाक्क असतात. कष्टाची कामे करूनही पुरेसा योग्य मोबदला

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) –7.675, Issue NO, 263 (CCLXIII)
ISSN : 2278-9308
November, 2020

मिळत नाही. दुय्यम प्रकाराची वागणूक मिळते. घरातील झाडलोट, स्वयंपाक, धुणीभांडी, लहान मुलांचे पालनपोषण, सासू सासऱ्यांची निगा राखणे इ. कामे पार पाडून उर्वरित वेळेत शेतीत राबावे लागते. याचा आरोग्यावर परिणाम होतो. शेतात पुरूषाच्या तुलनेत महिला अधिक राबतात परंतु त्यांच्या कार्याचा उल्लेख कोठेच होत नाही. कष्टाचे सर्वश्रेय पुरूष होतात १५ ऑक्टोबर हा देशात 'राष्ट्रीय महिला शेतकरी दिन' म्हणून साजरा केला जातो.

➢ संशोधनाचे उदेश:—

**संशोधनाचे खालील प्रमाणे उदेश निश्चित करण्यात आले आहेत.**

१. प्रस्तावना करणे.
२. महिलांच्या कामकाजाचा अभ्यास करणे.
३. शेती विकासात महिलांचे योगदान.
४. निष्कर्ष काढणे.

➢ **संशोधनाची गृहीतके—**

**सदर** शोधनिबंधाची **खालील गृहीतके निश्चित करण्यात आली आहेत.**

१. शेती आणि कुंटूबांचा भार महिला पेलतात.
२. शेतीतील कष्टाच्या मोबदल्यात भेदभाव केला जातो. त्यांना पुरूषाइतका सन्मान मिळत नाही.

➢ **अभ्यास पध्दती.**

सदर शोधनिबंधासाठी द्वितीयक साधन सामग्रीचा वापर करण्यात आलेला असून त्यात संदर्भगृंथ, दैनिक वर्तमान पत्रातील अगलेख, मासिके, इंटरनेट इत्यादीचा वापर करून निश्चीत उदेशानुसार शोधनिबंध तयार करण्यात आला आहे.

➢ महिला **आणि** शेती :—

भारतीय कुटुंब व्यवस्थेत पुरूषांपेक्षा स्त्रियांचे योगदान मोठया प्रमाणात आहे. नोकरी किंवा इतर कामामुळे पुरूष घराबाहेर असताना घर सांभाळणे, कुटुंबातील अडीअडचणी सोडविणे ही सर्व संस्कृती आहे. १५ ऑक्टोबर हा दिवस दरवर्षी आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिवस म्हणून साजरा करण्यासंबंधीचा ठराव २००७ साली संयूक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने समंत केला. या ठरावात ग्रामीण विकास, अन्न सुरक्षा आणि असल्याचे नमूद केले आहे. भारतात 'राष्ट्रीय महिला शेतकरी दिन'म्हणुन साजरा केला जातो.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 263 (CCLXIII)
ISSN : 2278-9308
November, 2020



Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



शेती व्यवसायात महिलांचा सहभाग ७० टक्के असून जमीनीची मालकी १२टक्के महिलांच्या नावे आहे. ८८टक्के सातबारा हा पुरूषांच्या नावे आहे. महिला शेतीत जास्त प्रमाणात कामे करताना दिसतात. शेती करणारी, शेतमालाच्या व्यापार विषयीचा निर्णय घेणारी, शेतमजूरी करणारी अशा विविध भूमिका पेलणाऱ्या महिलांची संख्या वाढत आहे. पीक उत्पादन, पशुधन क्षेत्र, फलोत्पादन, कापणीनंतरची कामे, सामाजिक वनिकरण, मत्यस्यपालन इ.कामात महिला महत्वपूर्ण भूमिका बजावीत आहेत. म्हणून शेती व्यवसायात महिलांचे योगदान मोठया प्रमाणात आहे. २०११ च्या जणगणनेनुसार एकूण शेती करणाऱ्यांपैकी ४०टक्के आणि एकूण शेतमजूरांपैकी ५०टक्के महिला आहेत. बचत गटाच्या माध्यमातून महिला घराबाहेर पडल्या आहेत. जमिनी कायद्यानुसार नावावर झाल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे.

आज शेती क्षेत्रात शेतकरी, उद्योजक, शेतमजूर अशा विविधांनी भूमिका बजावणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढत आहे. कृषीक्षेत्रातील महिलांच्या या वाढत्या सहभागाची दखल राजकीय पक्ष किंवा धोरणकर्त्यांनी पुरेशी घेतली नसल्याचे दिसते. कामाच्या बाबतीत महिला पुरूषांच्या बरोबरीने शेतात राबूनही महिलांना पुरूषा इतका सन्मान दिला जात नाही. शेतीमधील ग्रामीण शेतीमधील महिलांची भूमिका ही फक्त मदत मानली जाते. दुर्देवाने महिलांचे हे योगदान काळाच्या ओघात दुर्लक्षित राहिले. ग्रामजिवनात स्त्रियांना खूपच कष्ट उपसावे लागतात. त्यांच्या कष्टाशिवाय शेती अपूर्णच आहे. पुरूषाच्या खांद्यायाला खांदा लावून त्या शेतात राबतात. स्वयंपाक करणे, पाणी भरणे, कपडे धुणे, मुलांची काळजी घेणे या घराच्या कामासह शेत स्वच्छता मोहिमेपासून ते शेतमाल काढणीपर्यंतची शेती विषयक कामे महिलाच करतात.

ISSN : 2278-9308
November, 2020

शेतीला जोडधंदा म्हणून कुकूटपालन, दूध व्यवसाय महिलाच सांभाळतात. घरगुती व्यवसायापासून दररोज ताजा पैसा कमवून कुटुंबाच्या दैनदिन गरजा भागवून बचत करतात. आर्थिक अडचणीच्या काळात मदत करतात. कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या शाश्वत विकासासाठी शेती व अन्न उत्पादनातील महिलांच्या योगदानाकडे दूर्लक्ष करता येणार नाही. महिला शेतीच्या कामात असल्यातरी विपणन आणि पैशाची उलाढाल पुरूष मंडळीच करतात. ग्रामीण भागात लांबवर जाऊन पाणी भरणे, घरातील सर्व कामे करणं, मुलांचा सांभाळ करणे ही महिलांचीच जबाबदारी आहे. समजून कार्य पार पाडावी लागतात.



Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani



शेतीत काम करणाऱ्या महिला शेतकरी त्यांना दुखणी आली तरी त्या काम करतच राहतात. त्यातून त्या दुखण्याकडे दुर्लक्ष होवून आजार वाढतच जातो. आरोग्याकडे कानाडोळा करतात. बळीराजाच्या सोबतीला शेतीतील अनेक कामे महिला करीत असतात. कामाच्या वेळी त्यांच्या शरीरास अनैसर्गीक स्थितीत बराच काळ राहावे लागते. खुरपणी करताना बराच वेळ पायावर भार देवून बसावे लागते. त्यामूळे पाठीचा मणका, पायांच्या स्नायूवर व गुडघ्यावर ताण येतो परिणामी कामाची गती मंद होवून शारिरीक आजार होतात. शेतीतील कामे,ऊन पाऊस, थंडी या बदलत्या हवामानात करावी लागत असल्यामुळे त्याचा स्वास्थावर परिणाम होवून त्यांना अनेक आजारांना सामोरे जावे लागते. पिकावर फवारलेल्या किटकनाशकामुळे, कीडीमुळे त्वचेवर परिणाम होवून त्वचा लाल होणे, खाजवणे, चट्टे पडणे, असे विविध त्वच रोग व श्वसनाचे आजार होण्याचा धोका संभवतो. लोखंडी अवजारांच्या वापरामुळे पायांना, हातांना इजा होतात. शेतकरी महिलामध्ये कुपोषन होवून अशक्तपणा, पित्ताच्या तक्रारी, अपूरे व अवेळी जेवण,कंबरदुखी,अल्यर

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 263 (CCLXIII)
ISSN : 2278-9308 November, 2020

इत्यादी आजार उदभवतात. सतत ओल्या जमिनीत कामे केल्यामुळे पायांच्या बोटांत चिखल्या येतात. करडई, अंबाडी, पिकांची कापणी करताना हातांना जखमा होतो.

महिलेने कसं राहावं, कस दिसावं, कसं बोलावं, हे प्रत्येक समाजाच्या पारंपारिक पध्दतीत रूढ झाले आहे. पुरूषप्रधान संस्कृती ने स्त्रीला दुय्यम स्थान दिले आहे. पुरूषांनी तीला, अर्धांगिणी समजण्याऐवजी तिला घरगुती, उपभोग्य वस्तू बनवून टाकले आहे. स्त्रीयावर अनेक प्रकारची बंधने लादल्यामुळे ती अबला बनली. ती सक्षम झाली नाही. एकूण लोकसंख्येपैकी अर्धी लोकसंख्या स्त्रीयांची असल्यामुळे स्त्री विकासाशिवाय समाज विकासाचा विचार करता येणार नाही. देशाला महिला सबलीकरणशिवाय उज्जवल भविष्य असूच शकत आहे. देशाचा विकास घडवून आणायचा असेल तर महिलांचे ग्रामीण भागापासून राजकीय सशक्ती करण झाले पाहिजे. ग्रामीन भागात महिला शेतीत कापूस वेचणी ८० किलो करतात.

शेती आणि कुटुंबाचा भार महिला एकहाती पेलतात. शेती नसलेल्या महिला मजूरी करून कुटुंब चालवितात. शेतीतील कष्टाच्या मोबदल्यात मात्र त्यांचा भेदभाव केला जातो. त्यांना पुरूषापेक्षा कमी मजूरी दिली जाते. ही दरी नष्ट होणे गरजेचे आहे.

➢ **संदर्भ ग्रंथ सुची**

१. डॉ. उर्मिला रेडडी: लोकप्रशासनातील कौशल्य विकास कार्यक्रम अरूण प्रकाशन लातूर
२. सुचिता देशपांडे : देशातली अन्नपुर्णा उपार्शीच दि.१५.१०.२०१९
३. पल्लर्षी हर्षे : महिलांनी शेत जमीनीवर अधिकार मिळवण्याचा एक यशस्वी प्रयत्न दि.१६ मे२०१९.
४. व्ही.एन.शिंदे : शेतीतील कष्ट स्त्रियांचे, क्षेय लाटले मात्र पुरूषांनी दि.०२ मे २०१९
५. डॉ. नितीप बाबर : तीचे शेतीतील योगदान दुर्लक्षितच सकाळ अग्रोवन दि.१२.०१.२०१९.

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani